**L. A. BILL No. XXIII OF 2026.**

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MOTOR VEHICLES TAX ACT.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३.**

**महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९५८ चा ६५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६५ याच्या पाचव्या अनुसूचीची सुधारणा.

२. महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमास (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) जोडलेल्या पाचव्या अनुसूचीमध्ये, अनुक्रमांक (१) या नोंदीऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :— १९५८ चा ६५.

"(१) ज्या वाहतुकेतर वाहनांना, त्यांच्या पहिल्या नोंदणीच्या दिनांकापासून १५ वर्षे पूर्ण झाले असतील अशा वाहनांच्या बाबतीत अशी १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर, प्रत्येक ५ वर्षांकरिता ठोक रकमेत,—

(क) दुचाकी,—

| | |
|---|---|
| (एक) बीएस-सहा व त्यावरील उत्सर्जन मानके असलेल्या; | २००० |
| (दोन) बीएस-चार व त्याखालील उत्सर्जन मानके असलेल्या; | ४००० |

(ख) दुचाकी व्यतिरिक्त इतर वाहने (पेट्रोलवर चालणारी वाहने),—

| | |
|---|---|
| (एक) बीएस-सहा व त्यावरील उत्सर्जन मानके असलेली; | ३००० |
| (दोन) बीएस-चार व त्याखालील उत्सर्जन मानके असलेली; | ६००० |

(ग) दुचाकी व्यतिरिक्त इतर वाहने (डिझेलवर चालणारी वाहने),—

| | |
|---|---|
| (एक) बीएस-सहा व त्यावरील उत्सर्जन मानके असलेली; | ३५०० |
| (दोन) बीएस-चार व त्याखालील उत्सर्जन मानके असलेली | ७०००.". |

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६५ याच्या सहाव्या अनुसूचीची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमास जोडलेल्या सहाव्या अनुसूचीमधील, अनुक्रमांक (१) येथील नोंदीमध्ये, स्तंभ (३) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, क्रेन्ससाठी कर, तीस लाख रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीन असेल.".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम (१९५८ चा ६५) या अन्वये आकारण्यात येत असलेला पर्यावरण कर व मोटार वाहन कर यासंबंधात, दिनांक ६ मार्च २०२६ रोजीच्या, वित्तीय वर्ष २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये अंतर्भूत असलेले प्रस्ताव अंमलात आणण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमात पुढीलप्रमाणे सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटतेः—

(१) ज्या वाहतुकेतर वाहनांना (खाजगी) त्यांच्या पहिल्या नोंदणीच्या दिनांकापासून १५ वर्षे पूर्ण झाली असतील अशा बीएस-चार आणि त्याखालील उत्सर्जन मानके असलेल्या वाहनांच्या बाबतीत, पर्यावरण करामध्ये वाढ करणे;

(२) क्रेन्ससाठी मोटार वाहन कर, कमाल तीस लाख रुपयांपर्यंत मर्यादित करणे.

२. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १३ मार्च, २०२६.

**प्रताप सरनाईक,**
परिवहन मंत्री.

## वित्तीय ज्ञापन

या विधेयकात, वित्तीय वर्ष २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये अंतर्भूत असलेले प्रस्ताव अंमलात आणता यावेत म्हणून, महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियमाच्या (१९५८ चा ६५) पाचव्या व सहाव्या अनुसूची यामध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे. हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव होईल अशा कोणत्याही तरतुदींचा या विधेयकामध्ये अंतर्भाव नाही.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक,२०२६ पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

**सन २०२६ चे वि.स.वि.क्र. २३– महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०२६**

**[महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम यातील उतारे]**

**(१९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५.)**

१. ते २५. *** *** *** ***

पहिली अनुसूची *** *** *** ***

दुसरी अनुसूची *** *** *** ***

तिसरी अनुसूची *** *** *** ***

चौथी अनुसूची *** *** *** ***

पाचवी अनुसूची

(कलम ३ क पहा)

| अ. क्र. (१) | वाहनाचा प्रवर्ग आणि आयुर्मान (२) | पर्यावरण कराचा दर (रुपयात) (३) |
|---|---|---|
| (१) | ज्या वाहतुकेतर वाहनांना त्यांच्या पहिल्या नोंदणीच्या दिनांकापासून १५ वर्षे पूर्ण झाली असतील अशा वाहनांच्या बाबतीत अशी १५ वर्ष पूर्ण झाल्यानंतर, प्रत्येक ५ वर्षाकरिता ठोक रकमेत, | |
| | (क) दुचाकी | २,००० |
| | (ख) दुचाकी व्यतिरिक्त इतर वाहने (पेट्रोलवर चारणारी वाहने) | ३,००० |
| | (ग) दुचाकी व्यतिरिक्त इतर वाहने (डिझेलवर चालणारी वाहने) | ३,५०० |
| (२) | *** *** *** *** | |
| (३) | *** *** *** *** | |

"सहावी अनुसूची

[कलम ३ (१ग) पहा]

| अ. क्र. (१) | मोटार वाहनाचे वर्णन (२) | नोंदणीच्या वेळेस एकाच वेळेस द्यावयाचा कर (३) |
|---|---|---|
| (१) | क्रेन्स,क्रॉम्प्रेसर्स, प्रोजेक्टर्स किंवा खनित्रे यांसारखी बांधकामाकरिता वापरली जाणारी कोणतीही मोटार वाहने. | मोटार वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के. |
| (२) | ओझे लादलेले असताना, ज्याचे नोंदणीकृत वजन ७५०० किलोग्रॅमपेक्षा अधिक नसेल अशी माल किंवा सामग्री यांची वाहतुकीकरिता वापरली जाणारी हलकी मालवाहू वाहने. | मोटार वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के.". |

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

[सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३.]

[महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमात आणखी
सुधारणा करण्याकरिता विधेयक.]

[श्री. प्रताप सरनाईक,
परिवहन मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.